## वार्ता टिपण दि.१०/०६/२०१९

**चतुश्रृंगी पोस्टेचे हददीत बेकायदेशिर चालणारे हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेचे खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचा छापा**

दि.०९/०६/०२०१९ रोजी निर्मल कॉर्नर शिवाजीनगर येथे हुक्का पार्लर चालु असलेबाबतची गोपनीय माहिती सहा.पोलीस आयुक्त सो.गुन्हे १ मा. श्री. समीर शेख सो. यांना मिळाली होती.सदर ठिकाणी जावुन कारवाई करणेबाबत श्री.बर्गे सो.यांनी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते यांना आदेश दिला होता. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोहिते हे स्वतः, स्टाफसह स.नं.१०८/९, निर्मल कॉर्नर,फलॅट नं.१०४, शिवाजीनगर पुणे येथे जावुन त्यांनी टाकलेल्या छाप्यात इसम नामे नागेश नामदेव गजघाटे वय २९ वर्ष रा.निर्मल नगर,फलॅट नं.४, स.नं.१०८/९, शिवाजीनगर पुणे हा स्वतःचे आर्थिक फायदयासाठी हुक्का पार्लर चालवित असलेचे निष्पन्न झालेने व तो तेथे असणारे २ इसमांना हुक्का देत असलेचे मिळुन आला. तेथे टाकलेल्या छाप्यात २०,४००/- रूपयाचे हुक्का पिण्याचे साहित्यासह मिळुन आला. सदरचे साहित्य हे पंचासमक्ष जप्त केले आहे. त्याबाबत चतुश्रृंगी पोस्टे येथे गु.र.नं. ५६८/२०१९ सिगारेट व अन्य तंबाकुजन्य पदार्थ उत्पादने अधिनियम सन २०१८ चे कलम ४-अ,२१-अ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्यात इसम नामे नागेश नामदेव गजघाटे यास ताब्यात घेतले आहे.

**वरील कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, मा.श्री. अशोक मोराळे सो, पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे सो., सहा.पोलीस आयुक्त श्री. समीर शेख सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र माहिते, पोलीस उप-निरीक्षक आनंद रावडे, पोलीस कर्मचारी प्रकाश मगर, महेश कदम, मनोज शिंदे व फिरोज बागवान यांनी केलेली आहे.**